दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १०२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१२ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेलमध्ये अमित ठाकरेंच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी सेनेची पुनर्बांधणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी आणि विद्यार्थी सेनेची बांधणी मजबूत करण्यासाठी अध्यक्ष अमित ठाकरे यांनी चांगलीच कंबर कसली आहे. मनसे नेते अमित ठाकरे यांनी सध्या कोकणात दौऱ्यांचा सपाटा लावला असून ते आज (सोमवार दि.११ जुलै) पनवेल दौऱ्यावर आले होते. यावेळी विद्यार्थी सेनेच्या पुनर्बांधणी संदर्भात त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थी सेनेत काम करू इच्छिणाऱ्या प्रवेशकर्त्यांचे अमित ठाकरे यांनी विद्यार्थी सेनेत स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.



सोमवारी उरण दौरा आटोपून पनवेल येथे आल्यावर अमित ठाकरे यांनी सर्वप्रथम १०० वर्षे जुन्या लिमये वाचनालयास भेट दिली. त्यानंतर लोकनेते दि बा पाटील यांच्या निवासस्थानी भेट देऊन विनम्र अभिवादन केले. त्यापुढे शहरातील जिजाऊ गडास भेट देऊन जेष्ठ नागरिक सभागृहात मनसे विद्यार्थी सेनेच्या बैठकीत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मनसे पदाधिकाऱ्यांशी पुनर्बांधणी संदर्भात चर्चा करून कार्यकर्त्यांना सूचनाही दिल्या. यावेळी मनसेचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेलमधील जेष्ठ नागरीक सभागृहात आल्यानंतर अमित ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील विविध समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थी सेनेचे युनिट बळकट करण्याच्या उद्देशाने हा दौरा सुरू केला आहे. विद्यापिठांतर्गत सिनेट सदस्यांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तळकोकणापासून विद्यार्थी सेनेच्या पुर्नबांधणीचे काम सुरू आहे. याला युवकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मराठी शाळा, फी वाढ, पालकांचे प्रश्न यासह विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांसंदर्भात विद्यार्थी सेनेचे युनिट कार्यरत असेल. ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना अडचणी जाणवतील त्याठिकाणी विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते स्वतः जाऊन त्या समस्यांबाबत आढावा घेऊन योग्य मार्ग काढतील अशी ग्वाही यावेळी मनसे नेते अमित ठाकरे यांनी दिली.

यावेळी अमित ठाकरे यांनी राष्ट्रीय सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक विजेती कु स्नेहल शत्रुघ्न माळी हिचा सत्कार केला. तसेच उझबेकिस्तान या ठिकाणी झालेल्या वर्ल्ड बॉडीबिल्डिंग अँण्ड फिजिक या आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांचाही सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जंगल सत्याग्रहातील हुतात्मा स्मारकांची पडझड

## देखभालीकडे लक्ष देण्याची पर्यटकांची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या १९३० सालच्या चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांच्या पुतळ्याची (शिल्प स्मारकांची) तसेच हुतात्मा स्मारकांची सध्या पडझड झाली आहे. त्यामुळे इतिहास प्रसिद्ध चिरनेर गावाला भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये, गणेशभक्तांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

ब्रिटीश सत्तेविरोध्दा उरण, पनवेल तालुक्यातील जनतेने चिरनेरच्या भूमीत २५ सप्टेंबर १९३० साली शांततेच्या मार्गाने आंदोलन उभारले, यावेळी ब्रिटीश सरकारच्या जुलमी पोलीस यंत्रणेने आंदोलन करत्यांवर बेछूट गोळीबार केला.

या गोळीबारात धाकू बारक्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी (चिरनेर), रघुनाथ मोरेश्वर न्हावी (कोप्रोली), रामा बामा कोळी (मोठी जुई), आनंदा माया पाटील (धाकटी जुई), परशुराम रामा पाटील (पाणदिवे), हसूराम बुधाजी घरत (खोपटा), आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे), या आठ आंदोलन करत्यांना वीर मरण प्राप्त झाले. तसेच ३८ आंदोलन करते जखमी झाले होते.

त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढल्या गेलेल्या या चिरनेर जंगल सत्याग्रहाला विशेष महत्व प्राप्त झाले. या गौरव व तेजस्वी लढ्याचे स्मरण युवा पिढीला व्हावा यासाठी चिरनेर गावातील स्मृतिस्तंभासमोर हुतात्मा स्मारकांची व हुतात्म्यांच्या पुतळ्याची (शिल्प स्मारकांची) उभारणी करण्यात आली. परंतू शासकीय प्रशासनाला गावातील स्मारकांकडे व हुतात्म्यांच्या पुतळ्याकडे लक्ष केंद्रित करण्यास वेळच मिळत नाही. त्यामुळे हुतात्मा स्मारकांची पडझड झाली असून नांग्या महादू कातकरी व परशुराम रामा पाटील या हुतात्म्यांच्या हातातील साहित्य (कोयता) निखळून पडला आहे. तसेच इतर हुतात्म्यांच्या हातातील ध्वजाची, अंगावरील कपड्याची पडझड सुरू झाली आहे.तरी हुतात्म्यांच्या स्मारकांना, हुतात्म्यांच्या पुतळ्याना नवा लूक प्राप्त करून देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी आदिवासी बांधव व इतिहास प्रसिद्ध गावात ये- जा करणारे पर्यटक नागरीक करत आहेत.

मागील वर्षी शासनाकडून सुमारे १० लाखांचा निधी हुतात्मा स्मारकांच्या सुशोभीकरणासाठी व ७ लाखांचा निधी हुतात्म्यांच्या पुतळ्याच्या दुरुस्ती आणि पत्र्याची शेड बांधण्यासाठी उपलब्ध झाला होता. परंतु निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे निधी वाया गेला आहे. तरी सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण, उरण पंचायत समिती व रायगड जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे अभियंता यांच्या कडून वसूल करण्यात यावा जेणेकरून पुढील कामे हि उत्तम दर्जाची होती. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी केली आहे.



# पर्यटन जीवावर बेतले ; भुशी धरणात बुडून मृत्यू

**दै.रायगड नगरी । पुणे**

लोणावळ्यात वर्षाविहार व पर्यटनासाठी आलेल्या एका पर्यटकाचा लोणावळ्यातील भुशी डॅममध्ये बुडून मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी घडली आहे. साहिल सरोज (वय-१९, रा.मुंबई) असं डॅममध्ये बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव आहे. या घटनेची माहिती मिळताच लोणावळा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करत स्थानिकांच्या मदतीने साहिलचा शोध घेत आहेत.

साहिल आणि त्यांच्या ग्रुपचे सुमारे २५० पेक्षा अधिक सहकारी पाच बसेसने लोणावळा व खंडाळ्यात वर्षाविहार व पर्यटनासाठी आले होते. दुपारी सर्व सहकारी हे भुशी डॅमच्या पाठीमागे असलेल्या धबधब्याकडे भिजण्यासाठी गेले होते. यावेळी धबधब्याच्या वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहातून येताना साहिलचे पाण्यात नियंत्रण सुटल्याने तो वाहत जाऊन पुढे काही अंतरावर भुशी डॅमच्या मागेच असलेल्या धबधब्यावरून सुमारे २५ ते ३० उंचीवरून खाली वाहत जाऊन भुशी डॅमच्या बॅकवॉटर मध्ये वाहत जाऊन बुडाला आहे.

या घटनेची माहिती मिळताच लोणा-वळा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करत स्थानिकांच्या मदतीने साहिलचा शोध घेत आहेत. तसेच शोध कार्यासाठी लोणावळ्यातील शिवदुर्ग मित्रच्या पथकाला पाचारण करण्यात आले आहे. अद्याप शोध मोहीम सुरू आहे.

# विहूर पुलावरील खड्ड्यांमुळे होत आहेत अपघात

**दै.रायगड नगरी । मुरुड**



मुसळधार पावसामुळे रस्त्यांना खड्डे पडले असून अपघातांची मालिका सुरुच आहे. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात अलिबाग-मुरुड राज्य मार्गावरील विहूर नदीवरील पुलाचा एक भाग वाहून गेला होता. त्या वेळी वाहतूक बंद पडली होती. या पुलावरील मोठं मोठे खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत.

डागडुजी करुन सा. बां. विभागाने एकेरी वाहतूक मजबुतीकरण आणि सुरु केली होती. मात्र, डांबरीकरण पावसाळा आला तरी झालेच नाही. पुलाच्या रस्त्यावरील संरक्षण भिंतीचे बांधकाम अजूनही झालेले नाही. उलट पुलावरील रस्त्यावर आधिक मोठे खड्डे पडून अपघात घडत आहेत. गुरुवारी सकाळी ज्युपिटर स्कुटी

.../२

## संक्षिप्त...

### ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी सर्वपक्षीयांनी एकत्र यावे : छगन भुजबळ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी सर्वपक्षीयांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी नवी दिल्लीत सांगितले. तसेच, आज देशभरातील ओबीसी समाजाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाचा मोठा प्रश्न देशात उभा राहिला आहे. सुरवातीला महाराष्ट्र, मध्यप्रदेश आता गुजरात आणि गोवा मध्ये देखील ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण स्थगित झाले आहे. त्यामुळे आरक्षणाची वारंवार निर्माण होणारी परिस्थिती पाहता केंद्र सरकारने ओबीसींना घटनात्मक आरक्षण द्यावे, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू स्टेडियममधील ऑल इंडिया सैनी समाज संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनात छगन भुजबळ बोलत होते. संघटनेचे अध्यक्ष दिलबागसिंह सैनी, उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य, उत्तर प्रदे-शचे माजी मंत्री स्वामीप्रसाद मौर्य, माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह, राजकुमार सैनी, इंद्रसिंह सैनी, खासदार संघमित्रा मौर्य, आमदार उषा मौर्य, मोतीलाल साखला, बापू भुजबळ आदी उपस्थित होते.

# वरंध घाटातील भिंत धोक्यात



**दै.रायगड नगरी । महाड**

पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणाला जोडणार्या महाबळेश्वर आणि वरंधा या दोन्ही घाटात पक्के नाले नसल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्यावर येत असल्याचे पहावयास मिळत आहे. दोन दिवस पडलेल्या पावसात ही स्थिती निर्माण होताच प्रशासनाने धावाधाव करत नालेसफाई करत अडत असलेल्या पाण्याला वाट मोकळी करून देण्यास सुरुवात केली आहे. वरंध घाटात भोर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आलेली पक्की भिंत यामुळे धोक्यात आली आहे.

वरंध आणि महाबळेश्वर या दोन्ही घाटात भोर आणि महाबळेश्वर सार्वजनिक बांधकामाने ऐन पावसाळ्याच्या तोंडावर देखभाल दुरुस्तीच्या कामांना सुरुवात केली होती. ही कामे करताना नालेसफाईकडे दुर्लक्ष करण्यात आले. ठिकठिकाणी डोंगरावरून कोसळणारे पाणी थेट रस्त्यावर येत आहे. गेली दोन दिवस या दोन्ही घाटात मुसळधार पाऊस पडत आहे. महाबळेश्वर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत विविध ठिकाणी आलेल्या दरडी काढण्याचे काम जून महिन्यापर्यंत सुरु होते. तर, अनेक ठिकाणी सरंक्षण कठडे उभे करण्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे. या घाटात कोसळणारे धबधबे अनेक ठिकाणी रस्त्यावर आल्याचे चित्र व्हायरल व्हिडीओच्या माध्यमातून समोर आल्यानंतर प्रशासन जागे झाले. वरंध घाटात वरंधपासून भोरपर्यंत डोंगर भाग असल्याने मातीचा भाग कोसळून रस्त्यावर येत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग सतत खोदकाम करुन कामे करत असल्याने माती खाली येण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. भोर आणि महाडच्या सीमेवर असलेल्या पवारवाडी आणि इतर गावांच्या जवळ नालेसफाई झाली नाही आणि धबधबे थेट रस्त्यावर आल्याने नव्याने बांधलेली भिंत खचल्याचे स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

वरंध घाटाप्रमानेच सातारा जिल्हा जोडल्या जाणार्या महाबळेश्वर घाटाचीदेखील गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीत मोठे नुकसान झाले आहे. जुलै २०२१ मधील अतिवृष्टीमुळे जावळी तालुक्यातील पश्चिम भागातील घाट मार्ग नादुरुस्त झाला होता. या घाटात रस्त्यावर

.../२

# प्रितम म्हात्रेंच्या साधेपणाने भारावले सुरक्षा रक्षक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे हे नेहमीच आपल्या 'डाऊन टू अर्थ' वृत्तीमुळे जनमानसात घर करून असतात. प्रितम म्हात्रेंच्या साधेपणाचा प्रत्यय पुन्हा एकदा त्यांनी पनवेल महापालिकेतील सुरक्षा रक्षकांबरोबर उभ्या उभ्यानेच केलेल्या भोजनाप्रसंगी आला.



पनवेल महानगरपालिकेत निवडून आलेल्या ७३ सदस्यांची पहिल्या पंचवार्षिकमधील मुदत संपली. मुदत संपण्याच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी दुपारी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी आपल्या दालनातील सर्व साहित्य बाहेर काढून कार्यालयाचा निरोप घेतला. त्यानंतर प्रितम म्हात्रे यांनी पालिकेतील सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि कार्यालयीन स्टाफच्या भेटीगाठी घेऊन प्रत्यक्ष आभार मानले. त्यादरम्यान तळमजल्यावर आल्यावर सुरक्षा रक्षकांचे आभार मानण्यासाठी प्रितम म्हात्रे त्याठिकाणी गेले असता जेवणाची सुट्टी असल्यामुळे सुरक्षा रक्षक जेवत होते. त्यावेळी प्रितम म्हात्रे यांना पाहून सर्व सुरक्षा रक्षक कर्मचारी उठून उभे राहिले. त्यावेळी प्रितम म्हात्रे यांनी नम्रपणे सर्वांना नमस्कार करून त्यांना बसण्याची विनंती केली. त्यावेळी सुरक्षा रक्षकांनी सहजपणे

.../२

# दि.१९ जुलै रोजी पनवेल येथे पनवेल उपविभागातील पोलीस पाटील पद भरतीसाठी महिला आरक्षणाची सोडत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल उपविभागातील रिक्त अस-लेली पोलीस पाटील ही पदे भरण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवून दिलेला असून या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पोलीस पाटील पद भरतीसाठी दि.१६ ऑक्टोबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार गावनिहाय आरक्षण निश्चित केलेले आहे. प्रत्येक प्रवर्गासाठी ठरविण्यात आलेल्या पदांमधून त्या त्या प्रवर्गातून ३० टक्के महिला आरक्षणासाठी सोडत काढणे आवश्यक आहे.

या महिला आरक्षणाची सोडत दि.१९ जुलै २०२२ रोजी सकाळी ११ वाजता मीटिंग हॉल, तालुका क्रीडा संकुल, साईनगर, पनवेल येथे पनवेल व उरण तालुक्यांची सोडत एकत्र काढण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी दि.१९ जुलै २०२२ रोजी नियोजित ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन पनवेल उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी राहुल मुंडके यांनी केले आहे.

# तळा तारणे येथे २२ वर्षीय मुलीचा विनयभंग

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुक्यातील तळा शहरा नजीक तारणे येथील बस स्टॉपवर उभ्या असलेल्या २२ वर्षीय मुलीचा विनयभंग करून अज्ञात इसमाने पोबारा केला.

पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार दुपारी सव्वा वाजता चे सुमारास हि मुलगी उभी असता तळा बाजूकडून मोटारसायकल वर अज्ञात इसम येऊन फिर्यादी चे समोर दोन तीन फेऱ्या मारून जवळपास कोणीही नाही याचा अंदाज घेऊन फिर्यादी जवळ थांबला म्हणून फिर्यादी पळून जात असताना पाठीमागून येऊन ओढणी ओढून हात टाकून लज्जा उत्पन्न होईल असे वाईट कृत्य करून विनयभंग केले व मांदाडकडे मोटार सायकल वरून पळ काढला.सदर तक्रारीची नोंद दि १०/७/२२रोजी गुन्हा रजिस्टर नं.६२/२०२३ भा.द.वि.क.३५४(अ)(२) करण्यात आली असून पुढील तपास पोलिस उप निरीक्षक शिवराज खराडे सहकारी करीत असून अज्ञात इसमास शोधण्याचे मोठे आव्हान उभे राहिले असून पिडीत मुलीला न्याय मिळून दिला जावा.

भाड्याने देणे आहे

जिल्हा सत्र न्यायालय, लोखंडीपाडा, रत्नाकर खरे मार्ग, पनवेल येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९८६७७०४४१६/ ९५९४०९३१११

# वीज दरवाढीचा शॉक

महागाईने गांजलेल्या सर्वसामान्यांचा उरलासुरला खिसाही पुरता साफ करण्याचा देशातील सर्वच यंत्रणांनी जणू पणच केलेला दिसतो. गेली दोन वर्षे स्थगित केलेल्या इंधन समायोजन आकाराच्या वसुलीला परवानगी आणि त्यातही झालेल्या वाढीमुळे सर्वच वीज कंपन्यांच्या वीजदरात वाढ झाल्याने नागरिकांच्या वीजबिलात दरमहा शंभर ते दोनशे रुपयांनी वाढ होणार आहे. आधीच महिन्याचे बजेट कोलमडलेल्या सर्वसामान्यांना चहूबाजूंनी कोसळणाऱ्या महागाईची आणखी किती संकटे झेलावी लागणार, याची कल्पनाच करवत नाही. राज्यातील 'महावितरण'च्या सुमारे पावणेतीन कोटी ग्राहकांना आणखी पाच महिने ही वाढ सोसावी लागेल, असे कंपन्यांनी सध्या म्हटले असले, तरी एकदा वाढलेले दर कमी होण्याच्या घटना दुर्मीळच असल्याने ती निमूटपणे सोसण्याशिवाय नागरिकांपुढे पर्याय नाही. प्रामुख्याने गेल्या काही महिन्यांपासून चाहूल लागलेली ही दरवाढ एका अर्थाने अटळच होती. उन्हाळ्यामुळे विजेच्या मागणीत प्रचंड वाढ झाली होती. त्यातच देशभरातील कोळशाचा पुरवठा विस्कळित होऊन त्याचेही दर वाढल्याने संपूर्ण वीजनिर्मितीवर परिणाम झाला होता. त्यामुळे वाढलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी मिळेल तेथून वीजखरेदी करण्याची वेळ आली होती. त्या परिस्थितीची किंमत आता या आकारापोटी मोजावी लागत असून, त्याचा अंतिम भार हा ग्राहकांनाच सोसावा लागणार आहे. करोनाच्या काळात इंधन समायोजन आकाराच्या वसुलीला स्थगिती देऊन यासाठी राखून ठेवलेल्या निधी संपल्यावर वसुली सुरू करण्याचे निर्देश वीज नियामक आयोगाने दिले होते. त्यानुसार खासगी कंपन्यांनी ही वसुली सुरू केली आहे. सर्वच वीजपुरवठा कंपन्यांना याचा फटका बसणार आहे. मात्र, एखाद्याची प्रकृतीच नाजूक असेल, तर हवामानात फरक पडला, तरी तब्येत बिघडते; त्याप्रमाणेच वीजगळती, चोरी, थकबाकी आणि अकार्यक्षमतेमुळे आधीच जर्जर झालेल्या 'महावितरण'कडून तर हा फटका सोसण्याची अपेक्षाच करता येणार नाही. 'महावितरण'ने यासाठी राखून ठेवलेली गंगाजळी गेल्या वर्षाअखेरीच समाप्त झाल्याने त्यांनी एप्रिलपासूनच हा आकार लागू केला होता, त्यात झालेल्या दरवाढीने सर्वसामान्य ग्राहकांवर प्रतियुनिट ६५ पैशांपासून अडीच रुपयांपर्यंतच्या वाढीचा बोजा पडणार आहे. उद्योगांच्या वीजदरात तर प्रतियुनिट एक रुपया ३५ पैशांनी वाढ होणार आहे. इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक महाग वीज महाराष्ट्रात मिळते. त्यातच आधीच करोना साथ आणि मंदीमुळे अडचणीत आलेल्या उद्योग क्षेत्राला मोठा दणका बसून त्यांचे अर्थकारण कोलमडल्यास उद्योग इतर राज्यांमध्ये जाण्याचा धोका आहे. तसे झाल्यास संपूर्ण राज्याच्या अर्थव्यवस्थेला याचा फटका बसू शकतो आणि वीज दरवाढीने उत्पादन खर्चात झालेल्या वाढीचा फटकाही अंतिमत: ग्राहकांनाच बसणार आहे. घरगुती, व्यावसायिक औद्योगिक आणि शेती अशा सर्व स्तरांतील ग्राहकांकडे वीजबिलांपोटी 'महावितरण'ची हजारो कोटी रुपयांची थकबाकी आहे. करोनाकाळात तर अनेकांना बिले भरणेच शक्य नसल्याने या थकबाकीचा डोंगर वाढतच गेला आहे. दुसरीकडे कागदोपत्री कितीही खेळ केले, तरी वीजगळती आणि चोरी नियंत्रणात आणणे महावितरणला शक्य झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. या अकार्यक्षमतेचा फटका आधीच सर्वसामान्य ग्राहकांना वेळोवेळी वीज दरवाढीच्या रूपाने सोसावा लागत आहे. 'महानिर्मिती'चा उत्पादनखर्च तुलनेने अधिक असल्याने ही वीज 'महावितरण'ला परवडत नाही. आता या चक्रातून सुटण्याचे कारण दाखवून राज्यातील प्रमुख शहरांत खासगी कंपन्यांना चंचुप्रवेश देण्याचे घाटत आहे, ते वेगळेच. अशा सगळ्या स्थितीमुळे वीज दरवाढ थांबण्याची चिन्हे सध्या तरी दिसून येत नाहीत. त्यातून सुटण्यासाठी वसुलीची धडक मोहीम हाती घेणे; तसेच गेली काही वर्षे शीतपेटीत गेलेल्या प्रीपेड वीजमीटरच्या योजनेलाही गती देण्यासारखे उपाय आहेत. मात्र, त्यासाठी लोकानुनय सोडून ठाम राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. अर्थात, एकीकडे बेरोजगारी, कमी झालेले उत्पन्न आणि दुसरीकडे नियमित होणाऱ्या दरवाढीने हैराण झालेले सर्वसामान्य नागरिक वीज क्षेत्रातील अर्थकारणातील ही अपरिहार्यता ऐकून घेण्याच्या परिस्थितीत नाहीत. चैनीची बातच सोडा; दैनंदिन वापराच्या प्रत्येक वस्तूच्या दरवाढीपुढे नागरिक हतबल झाले आहेत. पेट्रोल-डिझेलच्या दरांत वाढ झाल्याने प्रवास खर्च महागला आहे. तो वाचविण्यासाठी विजेवरील वाहने घ्यावीत, तर आता विजेचे दरच वाढल्याने तीही सोय राहिली नाही. मालवाहतुकीचा खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तूंची महागाई त्यालाच सोसावी लागते. पुन्हा महागाई रोखण्यासाठी व्याजदर वाढल्याने कर्जांचे वाढीव हप्ते त्यालाच भरावे लागतात. त्यामुळे कारण काही असले, तरी परिस्थितीचा बळी तोच ठरत असून या दुष्टचक्रातून सुटका होण्याच्या आशा अंधुक होत आहेत. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय समस्यांसारख्या मुद्द्यांमध्ये तथ्य असले, तरी ही कारणे तोंडावर फेकून सर्वसामान्यांना किती काळ गप्प करणार, हा प्रश्नच आहे.

# कोणता झेंडा घेऊ हाती, म्हसळा शिवसेना कार्यकर्ते संभ्रमात ; काही शिवसैनिक विकासाच्या मागे राहणार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

शिवसेनेत विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने मोठी बंडाळी करून राज्यात पुन्हा भाजप युतीचे सरकार स्थापन केले आहे त्या मुळे शिवसेना पक्षात मोठी दुफळी निर्माण झाली आहे. जिकडे तिकडे गटा तटाची चर्चा ऐकायला मिळत असताना म्हसळा तालुक्यातील शिवसेना संघटना संभ्रमात पडली असल्याचे निदर्शनास येत आहे.

राज्यात सत्तांतर नाट्य घडले असले तरी शिवसेनेच्या कोणत्या गटाला पाठींबा द्यावा याच विचारात पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिक असल्याचे निदर्शनास येत आहेत.आता पर्यंत तालुका पातळीवर शिवसेना संघटनेने कोणतीच बैठक, सभा किंवा बॅनर बाजी केलेली नाही त्यामुळे सामान्य शिवसैनिक जास्त संभ्रमात पडले असावे असे वाटते एकंदरीत कोणता झेंडा घेऊ हाती असा प्रश्न शिवसैनिकांना पडला आहे. महाराष्ट्र राज्य विधान परिषदेची निवडणूक संपताच शिवसेना पक्षात मोठी बंडाळी झाली आणि शिवसेना पक्ष प्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागलेआणि सत्ता संपुष्टात आली. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे तब्बल ४० आमदारांचा वेगळा गट तयार करून राज्यात भाजप सोबत नवीन सरकार स्थापन केले. शिवसेनेत पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांची मुळ शिवसेना आणि मुख्मंत्री एकनाथ शिंदे गट शिवसेना असा वाद उभ्या महाराष्ट्र राज्यात सुरु आहे.

त्यातच रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे तीनही आमदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले असल्याने म्हसळा तालुक्यातील शिवसेना संघटना अधिक संभ्रमात पडली आहे. म्हसळा तालुक्यातील शिवसेना संघटनेला अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि महाडचे आमदार भरतशेट गोगावले हे अगदी जवळचे वाटतात याच आमदारांचे पक्ष संघटनेला आणि तालुक्यात वेळोवेळी होणाऱ्या निवडणुकीत सर्व त्या प्रकारचे सहाय्य मिळत होते असे सांगितले जाते.

आम. भरतशेठ मात्र आजपर्यतच्या संघटनेवरील अडी -अडचणींना साथ देऊन सामोरे गेले आहेत त्यामुळे काही जाणकार शिवसैनिकांच्या मते मूळ शिवसेनेची धैय धोरणे कायम ठेऊन आपलेंपण आणि विकास यासाठी भरत शेठ गोगावले यांची साथ देण्याच्या मनस्थितीत असल्याची चर्चा ऐकावयास मिळते, एकीकडे शिवसेनेचे रायगड जिल्ह्यातील सर्वच आमदारांनी बंड केले असले तरी त्यांचे बरोबर जाण्यास किंवा त्यांचे गटाला पाठींबा द्यावा अशी मानसिकता आता तरी कोणी व्यक्त केलेली नाही किंवा तशा प्रकारचा पाठींबा जाहीर केला नाही. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांची शिवसेना संघटना सोडण्यास सामान्य शिवसैनिक तयार नसल्याचे म्हसळा तालुक्यात एकंदरीत वातावरण दिसत आहे.असे असले तरी वरिष्ठ पातळीवर शिवसेना पक्ष संघटनेला वेळीच सावध होऊन दखल घ्यावी लागणार आहे. म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसची एकहाती सत्ता असली तरी तालुक्यात शिवसेना भरभक्कम आहे.नव्याने पक्षात मोठी बंडाळी झाली असल्याने येथील शिवसैनिक शिव-सेना आमदारांच्या जवळचे असल्याने तालुक्यात फुटीची लागण झाली तर नवल वाटणार नाही. शिंदे गटाने कडवट हिंदुत्व भुमिका घेतली असल्याने अनेक शिवसैनिकांचे मन परीवर्तन होऊ शकतो किंवा राज ठाकरे यांची महाराष्ट्र नव निर्माण सेना असा पर्याय असू शकतो अश्या शक्यताही नाकारता येत नाही.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशी उत्साहात साजरी



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

गेली दोन वर्षे कोरोनामुळे असलेले निर्बंध आता नसल्याने नागोठण्यातील श्री ज्ञानेश्वर व विठठ्ल रूक्मिणी मंदिरात रविवारी (दि.१०) आषाढी एकादशी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त येथील संत सेवा मंडळाच्या वतीने ज्ञानेश्वर मंदिरात सकाळी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी एकादशी निमित्ताने विठू माउलीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती.

श्री ज्ञानेश्वर मंदिरातील आषाढी एकादशीच्या या कार्यक्रमाची सुरुवात पहाटे चार वाजता श्री विठ्ठल रूक्मिणी यांच्या काकड आरतीने करण्यात आली. त्यानंतर विठ्ठल रूक्मिणींच्या मुर्तींवर महाअभिषेक करण्यात आला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस.डी. परमार इंग्लिश मिडियम स्कूल व होली एंजल्स स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून संताच्या व वारक-यांच्या वेशात दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंड्याचे मंदिरात आगमन झाल्यानंतर या छोट्या वारकऱ्यांचे श्री संत सेवा मंडळाच्या वतीने फुले देऊन स्वागत करण्यात आले व त्यांना प्रसाद म्हणून केळी व लाडूचे वाटप करण्यात आले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सुधाकर जवके यांनी सर्व भक्तांना खिचडीचा फराळ दिला. तर नागोठणे ग्रा.पं.च्या सदस्या सुप्रिया संजय महाडिक, मोहित प्रोव्हीजन स्टोअर, राष्ट्रवादीचे युवा कार्यकर्ते प्रथमेश काळे, डॉ. अभिषेक शहासने, संतोष जाधव, पोलीस हवालदार विनोद पाटील यांनी केळी वाटप केले. तसेच सत्यभामा ठोंबरे व मनोज वाघमारे यांनी जमलेल्या भक्तांना राजगिरा लाडूचे वाटप केले.

शेवटी सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हभप विजय महाराज शहासने यांनी विठ्ठल भक्तांसाठी सुश्राव्य असे प्रवचन केले. नंतर हरिपाठाच्या कार्यक्रमाने या धार्मिक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. नागोठण्यातील श्री ज्ञानेश्वर मंदिरातील आषाढी एकादशीच्या या धार्मिक कार्यक्रमाला संत सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले अजगराच्या पिलाला जिवदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूड - डोंगरी येथे स्वामी समर्थ मठात आढळून आलेल्या दिडफुटी फुटी अजगराच्या पिलाला सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने सुरक्षितपणे पकडून वनविभागाच्या सहकार्याने जवळील जंगलात सोडून जिवदान दिल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

मुरुड जवळील डोंगरी येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ मठात आज सकाळच्या वेळेत सर्प असल्याचे आढळून आले असता ग्रामस्थ मनू मसाळ यांनी सर्पमित्र संदीप घरत मोबाईलवर संपर्क साधून कळविले.सर्पमित्र संदीप घरत यांनी क्षणाचा विलंब न करता डोंगरी येथे स्वामी समर्थ मठात येऊन आपल्या कौशल्याने तेथे असलेल्या दिड फुटी अजगराच्या पिलाला पकडून वनविभागाच्या सहकार्याने जवळील जंगलात सुरक्षितपणे सोडून दिल्याबद्दल संदीप घरत यांचे कौतुक होत आहे. जर अशा प्रकारे कोणाला कोणताही सर्प आढळून आल्यास नजिकच्या वनविभागाशी संपर्क साधावा. या मुक्या प्राण्यांना मारु नये.असे आवाहन सर्प मित्र संदिप घरत यांनी केले आहे.

# वृद्ध महिलेसह तिच्या मुलाला करण्यात आली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका साठ वर्षीय वृद्ध महिलेसह तिच्या मुलाला घराचे कुंपण तोडल्याच्या समजुतीने मारहाण केल्याची घटना तालुक्यातील वाजे येथील कातकरी वाडी येथे घडली आहे.

पप्पू कातकरी यांच्या घराचे कुंपण अनुसया किसन कातकरी (वय ६०) यांनी तोडले असल्याचे समजून त्याने तिला शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण करून तिच्या डोक्यास व दोन्ही हातास दुखापत केली तसेच त्यावेळी तिचा मुलगा रघुनाथ हा सोडवण्यासाठी गेला असता त्याला सुद्धा मारहाण केल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे वृक्षदिंडी आणि वृक्षारोपण उपक्रम



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत निसर्गाला तसेच पर्यावर्णालाच विठ्ठल मानून आपण आयोजित केलेल्या वृक्षदिंडी आणि वृक्षारोपण हा उपक्रम भरपूर उत्साहात आणि उदंड प्रतिसादाने पार पडला. रोटरीयन्स, ऍनस, अनेटस असे जवळपास ५० जणांनी कर्नाळा अभयारण्यात जाऊन वृक्षदिंडी काढली. विठ्ठल नामाचा जयघोष करीत आणि अभंग म्हणत संपूर्ण वातावरण भक्तिमय करून टाकले.

वृक्षारोपणा साठीच्या पोषक पावसाळी वातावरणाचा आनंद घेत तेथील वनचर प्राणी, पक्षांसाठी आवश्यक अश्या ५० विविध फळझाडांचे आणि तिथल्या वातावरणासाठी आवश्यक असलेल्या झाडांचे, रोपांचे वृक्षारोपण केले. कर्नाळा अभयारण्यातील वन अधिकारी यांची गरज आणि विनंती लक्षात घेऊन रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि भारत गॅस सर्व्हिस यांच्या वतीने ६ मोठया आकाराचे सुचनाफलक मोक्याच्या जागी लावण्यासाठी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ .गिरीश गुणे आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे सेक्रेटरी डॉ. आमोद दिवेकर, अध्यक्ष लक्ष्मण पाटील, माजी अध्यक्ष शिरीष वारंगे, संतोष घोडींदे, डॉ अभय गुरसाळे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. या उपक्रमात रो. शिरीष वारंगे यांनी खूप मेहनत घेतल्याचे दिसून आले. सर्व रोटरीयन्स , ऍनस आणि अनेटस यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी केलेली मदत आणि दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल कर्नाळा वन अधिकाऱ्यांनी सर्वांचे आभार मानले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विहूर पुलावरील खड्ड्यांमुळे होत आहेत अपघात

घेऊन जाणाऱ्या मुरुडच्या प्रीतम वाळंज या युवतीची पुलावर स्कुटी घसरुन ती जखमी झाली असून जीवघेणा मोठा प्रसंग सुदैवाने टळला आहे. अधिक पाऊस पडल्यास या पुलाचा भराव वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा प्रतिक्रिया येथिल नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

अशीच परिस्थिती काशीद - सर्वे गावानजिकच्या चिकणी नदीवरील पुलाची असून गेल्या वर्षी पुलाची संरक्षक भिंत वाहून गेली होती. त्याची डागडुजी केली असली तरी नदीतील पाण्याचा वेग पाहता तो पूल किती काळापर्यंत तग धरेल अशी शंका व्यक्त केली जात आहे.

## वरंध घाटातील भिंत धोक्यात

आलेल्या दरडी हटवण्यात आल्या असल्या तरी रस्त्याला लागून असलेल्या दरडी आणि माती हटवण्यात आली नाही. यामुळे महाबळेश्वर हद्दीतील भागात नाल्यातील पाणी रस्त्यावर येत आहे. सरंक्षक भिंती, गॅबियन पद्धतींच्या भिंती, नाले सफाई, आदींची कामे आजही अर्धवट अवस्थेत पडून आहेत. महाबळेश्वर भागात दरडींचे प्रमाण मोठे असून, डोंगर उतारावर आलेले दगड, माती हटवण्यास महाबळेश्वर सार्वजनिक बांधकाम विभागाला एक वर्ष लागले त्यामुळे नाल्यात पडलेली माती तशीच ठेवण्यात आली. नाले तुंबून हे पाणी रस्त्यावर येऊ लागले आहे. सध्या दोन्ही घाटात आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली असल्याने साचून राहिलेल्या पाण्याला वाट काढून देण्याचे काम केले जात आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करणारी व्यवस्था दोन्ही घाटात व्यवस्थित नसल्याने हे पाणी साचून राहात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## प्रीतम म्हात्रेंच्या साधेपणाने भारावले सुरक्षा रक्षक

'जेवायला या ' असे प्रितम म्हात्रे यांना सांगताच क्षणाचाही विलंब न करता उभ्या उभ्यानेच प्रितम म्हात्रे यांनी सुरक्षा रक्षकांबरोबर जेवायला सुरुवात केली. त्यामुळे सारे सुरक्षा रक्षक भारावून गेले.

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते पालिकेतील सुरक्षा रक्षकांबरोबर उभ्यानेच जेवत असल्याचे पाहून पालिकेत आलेल्या नागरिकांनी हा क्षण आपल्या मोबाईलच्या कॅमेरात कैद केला.

# अमरनाथ यात्रेकरू नातेवाईकांची माहिती जिल्ह्यातील नातेवाईकांनी जिल्हाधिकारी कार्यालयास त्वरित कळवावी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

यावर्षीच्या अमरनाथ यात्रा मार्गामध्ये ढगफुटी / अतिवृष्टी झाल्यामुळे यात्रेकरु अडकून पडले आहेत. त्यापैकी काही यात्रेकरु अद्याप बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले आहे.

रायगड जिल्हयातील नागरिक अमरनाथ यात्रेसाठी गेले असल्यास त्यांना आवश्यक मदत पोहोचविण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांनी त्या यात्रेकरू नातेवाइकांची नावे व संपर्क क्रमांक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास ०२१४१-२२२०९७ व ८२७५१५२३६३ या क्रमांकावर तातडीने कळवावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

जिल्हा प्रशासन व राज्य शासनामार्फत आपल्या नातेवाईकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी या आवाहनास तात्काळ प्रतिसाद द्यावा, असेही जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# जासई हायस्कूलमध्ये सुरेश पाटीलांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि .बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई.या विद्यालयात चालू शैक्षणिक वर्षाची विद्यालयाची स्कूल कमिटीची व सल्लागार समितीची सभा विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या अध्यक्षतेखाली व कामगार नेते सुरेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाली.

विद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे लाईफ वर्कर यांनी विद्यालयाच्या विकासाच्या सुविधांचा आढावा घेतला तसेच विद्यालयाच्या अडचणी विषयी चर्चा करण्यात आली.कामगार नेते सुरेश पाटील यांना अखिल भारतीय पोर्ट ऑथॉरिटी च्या वेतन सल्लागार सदस्य पदी निवड झाल्याबद्दल ,सल्लागार समितीचे सदस्य डी. आर .ठाकूर यांना रायगड भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

याशिवाय दहावी, बारावी कला व विज्ञान विभागात प्रथम तीन आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .यावेळी सल्लागार समितीचे सदस्य नरेश घरत, अविनाश पाटील, यशवंत घरत ,अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर, बाळासाहेब पाटील,मधुकर पाटील,प्रभाकर मुंबईकर,जे.सी.घरत,हिरामण पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते .शेवटी रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख यांनी आभार मानले.


अर्जदाराचे वकील
श्री.योगेश ना. म्हात्रे

**जाहीर नोटीस**

उरण येथील दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५२/२०१९
नि.नं.३६/ड
ने.ता.१७/०८/२०२२

श्री.राजेश प्रकाश नाखवा वगैरे ३ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी खालील प्रमाणे सदरची मिळकत अर्जदार यांना त्यांची आजी कै.हिरुबाई मोतीराम कोळी यांच्याकडून वारस हक्काने आलेली मिळकत आहे. हिरुबाई या दि.३०/०७/१९८५ रोजी उरण येथे मयत झाल्याने त्यांचे वारस म्हणून त्यांचा मुलगा जगन मोतीराम कोळी यांच्याकडे सदरहू मिळकत वारसा हक्काने आली आहे. त्यानंतर अर्जदार यांच्या आईचे वडील जगन मोतीराम कोळी हे दि.०१/०८/१९९२ रोजी त्यांच्या राहत्या घरी मयत झाले. जगन मोतीराम कोळी यांना अर्जदार यांची आई लिलाबाई ही कायदेशीर वारस होती. जगन मोतीराम कोळी यांच्यानंतर अर्जदार यांची आई लिलाबाई प्रकाश नाखवा लग्नाआधीचे नाव लिलाबाई जगन कोळी या दि.०६/१०/२०१८ रोजी के.ई.एम. हॉस्पिटल येथे मयत झाल्या. अशा प्रकारे सदरची मिळकत अर्जदार यांच्या आजी नंतर अर्जदार यांच्याकडे वारसाहक्काने आलेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस क्र. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| चाणजे | ३३ | १४५ | २ | ०-८६-५ |

कै.लिलाबाई प्रकाश नाखवा उर्फ लिलाबाई जगन कोळी या दि.०६/१०/२०१८ रोजी के.ई.एम. हॉस्पिटल येथे मयत झाल्या. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही इसमाच्या हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सावली ग्रामस्थांनी केली ५०० वृक्षांची लागवड



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील सावली ग्रुप ग्राम पंचायत हद्दीतील मौजे सावली येथील ग्रामस्थांनी आषाढी एकादशी निमित्त लोकसहभागातून वृक्ष लागवड कार्यक्रम – २०२२ आयोजित करून आपल गाव आपली जबाबदारी या संकल्पनेअंतर्गत ५०० विविध जातींच्या वृक्षांची लागवड केली.

या कार्यक्रमाअंतर्गत सावली गाव हद्दीतील रस्त्याच्या कडेला व दरडग्रस्त भागात बांबू लागवड करून राज्य सरकारच्या उपक्रमाला हातभार लावून आपले कर्तव्य बजावले. सावली ग्रामस्थांनी या कार्यक्रमाची सुरुवात नारळ वाढवून केली. या कार्यात गावातील सर्व लहान थोर मंडळींनी उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला मुंबईकर ग्रामस्थ मंडळीनीही उपस्थित राहून श्रमदान केले.

परंतु आजच्या काळामध्ये प्रदूषण आणि ग्लोबल वार्मिंगचा संभाव्य धोका टाळण्यासाठी वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन आणि वृक्ष संगोपन करून पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे.

वृक्ष लागवडीने वन क्षेत्रामध्ये झाडांची संख्या वाढून पर्यावरणाचा समतोल बनवण्यासाठी शासन अलीकडच्या काळामध्ये अनेक अभियान राबवत आहेत. ( उदा – झाडे लावा झाडे जगवा, वृक्ष लागवड व संवर्धन काळाची गरज इत्यादी ) या सर्व उपक्रमात या समाजाचे आपणही काही देणे लागतो या भावनेतून एक जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्य पार पाडावे याची जाणीव या उपक्रमाच्या माध्यमातून करून दिली. या कार्यक्रमात सावली ग्रामस्थ सर्व सभासद व मुंबईकर सभासद, लहान थोर सर्वांनी सहभाग घेतला होता.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# जेएनपीएच्या दोन कामगार विश्वस्त पदांसाठी २ ऑगस्टला निवडणूक

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ऐवजी अॅथोरिटी अॅक्ट स्थापनेनंतर मागील वर्षभरापासून लांबणीवर पडलेली दोन कामगार विश्वस्त पदांसाठी दि.२ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणूक घेण्याची घोषणा काल सोमवार दि.११ जुलै २०२२ आयोजित करण्यात आलेल्या कामगार संघटनांच्या बैठकीत केंद्रीय श्रम आयुक्तांनी केली आहे. यामुळे जेएनपीएच्या विविध कामगार संघटनांची धावपळ सुरु झाली आहे.



जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ऐवजी अॅथोरिटी अॅक्ट स्थापन झाला आहे.जानेवारी २०२२ पासून बंदराचे कामकाज या अॅथोरिटी अॅक्टनुसारच सुरूही झाला आहे. दरम्यान तीन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या दोन कामगार विश्वस्तांची मुदत वर्षांपूर्वीच तर आणखी मार्च २०२२ पर्यंत देण्यात आलेली एक वर्षाची मुदतवाढही संपुष्टात आली आहे. त्यामुळे एप्रिलमध्ये दोन कामगार विश्वस्त पदांसाठी निवडणूक घेणे अपेक्षित होते.

विश्वस्त पदाच्या निवडणुकीत सुमारे ५०० स्वेच्छानिवृत्ती नंतर ६७० कामगार मतदार उरले आहेत. निवडणुकीसाठी बंदरातील मान्यता प्राप्त कामगार संघटनांनी जय्यत तयारीही सुरू केली होती. मात्र निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियुक्ती अभावी निवडणूक कार्यक्रमच जाहीर झाला नसल्याने मागील वर्षभरापासून दोन कामगार विश्वस्तांची निवडणूक लांबणीवर पडली होती.

दरम्यान केंद्रीय श्रम आयुक्तांनी दोन कामगार नियुक्त ट्रस्टी पदासाठी जेएनपीएच्या कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची काल सोमवारी मुंबईत बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीसाठी केंद्रीय डेप्युटी चीफ लेबर कमिशनर तेज बहादुर, जेएनपीएचे आजी-माजी कामगार विश्वस्त व विविध चार कामगार संघटनेचे पदाधिकारी दिनेश पाटील, भुषण पाटील रविंद्र पाटील व एम.के. पाटील आदी उपस्थित होते. येत्या २ ऑगस्ट २०२२ रोजी गुप्त मतदानाने निवडणूक घेण्याचे निर्देश दिले असून मतमोजणीही त्याच दिवशी होणार असल्याची माहिती संबंधित कामगार विश्वस्त रविंद्र पाटील व भुषण पाटील यांनी दिली आहे.

# नरवीर तानाजी मालुसरे यांच्या कर्मभूमी उमरठ येथील ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार धारातीर्थी कोसळला

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या कर्मभूमी उमरठ येथील ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेला एक विशाल वृक्ष अखेर धारातीर्थी कोसळला.

येथील अनेक वर्षांपासून जुना व अनेक पिढ्या लहानाच्या मोठ्या झालेल्या पाहिलेल्या तसेच शिवकालीन ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहिलेला आंब्याचा वृक्ष मुसळधार पावसात जमीनदोस्त झाल्याने अनेकांच्या नयनांनी अश्रू धारा गाळल्या.

या वृक्षाची संथ छाया, पाने, फळे आजवर अनेकांना गोडवा व समाधान देणारी होती. सदर वृक्ष कोसळल्याने अनेकजण हळहळले. या घटनेने तिथे कुठलिही अनुचित दुर्घटना घडली नाही, परंतू काही प्रमाणात स्मारकाच्या तटबंदीचे नुकसान झाले आहे. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते रामदास कळंबे यांनी दिली.



# सोन्याची नाणी विकत देण्याच्या बहाण्याने कस्टम विभागातील अधीक्षकाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इंग्रजांच्या काळातील सोन्याची नाणी विकत देण्याच्या बहाण्याने एका टोळीने कस्टम विभागातील अधीक्षकाकडून तब्बल १३ लाख ५० हजार रुपये उकळून त्याला ५०० खोटी व बनावट नाणी देऊन त्याची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. न्हावा शेवा पोलिसांनी या टोळीतील त्रिकुटाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली व्यक्ती भारतीय कस्टम विभागात अधीक्षक म्हणून कार्यरत आहे. राजू प्रजापती नावाच्या व्यक्तीने आपल्याकडील इंग्रजांच्या काळातील सोन्याच्या नाणी विकायची असल्याचे सांगितले व त्याबाबत बोलणी करण्यासाठी कळवा येथे येण्यास सांगितले. तेथे प्रजापतीने एक महिला व पुरुष यांच्यासह अधीक्षकाची भेट घेतली. त्यानंतर त्या तिघांनी त्यांच्याकडे असलेली १५०० सोन्याची नाणी दाखविल्यानंतर त्यातील १५-२० नाणी तपासण्यासाठी अधीक्षकाने मागून घेतली. मात्र त्या तिघांनी त्याला फक्त एकच नाणे दिले. अधीक्षकाने ते नाणे तपासून घेतले असता, तेही खरे असल्याचे सोनाराने त्याला सांगितले. त्यानंतर अधीक्षकाने त्रिकुटाकडे असलेली सर्व सोन्याची नाणी विकत घेण्याची तयारी दर्शविली असता टोळीने त्याला १५ लाख रुपये घेऊन भिवंडी येथे मानकोली नाका येथे येण्यास सांगितले. अधीक्षकाने घरातील दागिने गहाण ठेवून, मित्रांकडून उसने पैसे घेऊन जमवलेले १३ लाख ५० हजार रुपये त्रिकुटाला दिले आणि त्यांच्याकडील नाणी घेतली. त्यानंतर अधीक्षक नाणी घेऊन उलवे येथे आल्यानंतर त्याने सोनाराकडून हे दागिने तपासून घेतले. सोनाराने ती खोटी व बनावट असल्याचे सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे अधीक्षकाच्या लक्षात आले. त्यानंतर त्याने न्हावाशेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# मुसळधार पावसामुळे उडदवणे येथील रस्त्याचे मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील रोहे-खांब मार्गावरील उडदवणे येथील रस्त्याला मुसळधार पावसाचा मोठा तडाखा बसल्याने येथील रस्त्याचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

हवामान खात्यांचे सर्व अंदाज फोल ठरवत यावर्षी जून महिना तसा कोरडाच गेला. तर जुलै महिन्याच्या पहिल्याच दिवसापासून पावसाने दमदार हजेरी लावून मुसळधार स्वरूपात बरसायला सुरूवात केल्याने हाहाकार उडविला. तर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पावसाने आपला जोर वाढविल्याने नदी, नाले व ओढे ओसंडून वाहू लागले. पर्यायाने सर्वत्र पुर परिस्थिती निर्माण झाल्याने सर्वच क्षेत्राला त्याचा फटका बसला. धो धो बरसलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला. तर उडदवणे येथील कालवा



ओसंडून वाहू लागल्याने कालव्यातील ओव्हरफ्लो झालेल्या पाण्यामुळे बाजूच्या मुख्य रस्त्याचे मोठे नुकसान झाले आहे. रस्त्याची मोठ्या प्रमाणात झीज झाल्याने एका बाजूचा रस्ता वाहून गेला आहे. अर्धा रस्ताच वाहून गेल्याने येथून मार्गक्रमण करताना मोठीच खबरदारी घ्यावी लागत आहे. त्यातच या मार्गावर सतत मोठी रहदारी चालू असल्याने संभाव्य अपघाताचा धोकाही वाढला आहे. तर येथील परिस्थितीचा अंदाज आला नाही तर बाजूच्या खचलेल्या रस्त्यामुळे चुकून अपघात झाला तर गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत संबंधित शासन यंत्रणेने या धोकादायक भागाची पाहणी करून लवकरच योग्य ती उपाययोजना करावी जेणेकरून संभाव्य धोका टळला जाऊ शकेल. अशा प्रकारची प्रतिक्रिया येथील रहिवासी व प्रवासी वर्गातून केली जाऊ लागली आहे.

# भाविकांना आकर्षित करणारा वारळ येथील श्री स्वयंभु गुरुदत्त तीर्थक्षेत्रातील धबधबा

## वर्षा सहलीसाठी उत्कृष्ठ निसर्गरम्य ठिकाण

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पावसाळा सुरु झाला की पुण्या मुंबईतील लोक एक दिवसीय सहलीसाठी म्हणजे 'वन डे' पिकनिक करता दर आठवड्याच्या अखेरीस बेस्ट डेस्टिनेशन सर्च करत बाहेर पडत असतात. त्यांची ठिकाणही जवळपास ठरलेली असतात म्हणजे विरार डहाणू, कर्जत खोपोली ते अगदी अलिबाग पर्यंत. ही अगदी नित्याची स्थळे. त्यात पावसाळ्यात ते भुशी धरण, भंडारदऱ्यापर्यंत पोचतात.


परंतु तुम्हाला निसर्गाचा निखळ आनंद आणि देवदर्शन या दोन्ही गोष्टींचा संगम घालावायचा असेल तर रायगड जिल्यातील हे एक अनोखे पर्यटन स्थळ उदयास येत आहे. म्हणजे एकाबाजूला एकावर एक रचल्यासारखे गगनास गवसणी घालणारे हिरवेगार डोंगर तर दुसऱ्या बाजूला प्रशस्त खाडी आणि त्यावर तरारलेला हिरवागार निसर्ग,हे निसर्गरम्य ठिकाण म्हणजे श्री स्वयंभु गुरुदत्त तीर्थक्षेत्र श्री गुरुदेव दत्त माऊलीने सगुण रुपात दिलेले दर्शन क्षेत्र होय. अतिशय निरव शांतता आणि भर नदीपात्रात निर्माण झालेले हे ठिकाण म्हणजे २१ व्या शतकातील चमत्कारच. कडा नदीचे पात्र आणि उंच डोंगरावरुन सुमारे १०० फूट सरळ कोसळणारा निर्झर धबधबा. या ठिकाणावर आल्यावर मन एकदम प्रफुल्लित होऊन जाते. या जागेची खासियत म्हणजे चारी बाजूंनी डोंगरांनी वेढलेले हे ठिकाण आणि भर नदीपात्रात गुहेत निर्माण झालेले हे स्वयंभु क्षेत्र.


महाकाय डोंगर म्हणून या ठिकाणी भांदा, कुबल्या, आकर, चाचलचोली, वाघबीळ असे ट्रेकिंगसाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत. मात्र या निसर्गरम्य स्थळी यावयाचे असल्यास आपणास नाश्ता आणि जेवण सोबत घेऊन यावे लागेल कारण अजूनही हे ठिकाण शुद्ध निसर्गाचा शालू पांघरुण आहे म्हणून हॉटेलिंग किवा पायाभूत सुविधेच्या माध्यमातून तितकेसे विकसित झालेले नाही.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री आदितीताई तटकरे यांनी हा भाग बराचसा विकसित केला आहे.भक्तनिवास बांधले आहेत परंतु अजून ते प्राथमिक अवस्थेत आहेत.

महाराष्ट्र शासनाने पर्यटनाच्या माध्यमातून विविध कामे हाती घेतली आहेत. श्री स्वयंभु गुरुदत्त मंडळ ही सामाजिक सेवाभावी संस्था या ठिकाणी कार्यरत असून पर्यटक आणि भाविक भक्तगण यांच्या सोयीसाठी त्यांच्या परीने विविध उपक्रम राबवित आहेत, असे मंडळाचे अध्यक्ष रुपेश नारायण पाटील यांनी सांगितले आहे.

तर मित्रांनो, या पावसाळ्यात एक अनोखा आनंद घ्यावयाचा असेल तर हे डेस्टिनेशन नक्की ट्राय करा. मुंबई पुण्यापासून फक्त २०० किमी वर आहे. तसेच प्रसिद्ध दिवेआगर येथील सुवर्ण गणेश दर्शनासाठी जाण्याच्या लगत आहे.





# १ कोटी १ लाख रुपयांची नळपाणी पुरवठा योजना मंजूर

## पाटणसई ग्रामस्थ व महिलांमध्ये आनंदी वातावरण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील पाटणसई ग्रामपंचायत हद्दितील नागरिकांसाठी खासदार सुनिलजी तटकरे यांच्या प्रयत्नामुळे केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन (सन २०२२- २३) योजनेतून प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुमारे १ कोटी ८ लाख ४६ हजारांची नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. या योजनेच्या प्रशासकीय मान्यतेचे पत्र नुकतेच खासदार सुनिल तटकरे यांनी राष्ट्रवादीकडे असलेल्या पाटणसई ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक व रोहा पं.स.चे माजी सभापती सदानंद गायकर यांच्याकडे सुतारवाडीतील गिताबाग येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात संपन्न झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात सुपूर्द केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मधुकर ठमके, पाटणसईचे माजी उपसरपंच पांडुरंग गायकर, संतोष राणे, राजेंद्र जोशी, निलेश कोतवाल आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



पाटणसईचे ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षांपासून पाण्याच्या भीषण समस्येने त्रस्त होते. पाटणसई ग्रामपंचायत हद्दीत यापूर्वीच्या पाणीपुरवठा योजनेची जलवाहिनी अनेक ठिकाणी सडून फुटल्याने पाटणसई गाव व अंतर्गत येणाऱ्या वाड्या आणि वाकणनाका येथे कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा व इतर अनेक कारणांनी ग्रामस्थांचे व महिलांचे पाण्यासाठी हाल सुरु होते. त्यामुळे सर्व महिलांतून नाराजीचा सूर उमटत होता. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते सदानंद गायकर यांचा खासदार सुनिल तटकरे यांच्याकडे सतत पाठपुरावा सुरू होता. त्यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

नवीन पाणीपुरवठा योजनेमुळे पाटणसई ग्रामपंचायत परिसरातील सर्व ग्रामस्थांना मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महिलांची पाण्यासाठी होणारी वणवण व त्रास आता भविष्यात वाचणार असल्याने ग्रामस्थांमध्ये व विशेषतः महिला वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. खासदार सुनिल तटकरे त्यांच्या प्रयत्नामुळे व रोहा पं. स.चे माजी सभापती सदानंद गायकर यांच्या पाठपुराव्यामुळे पाटणसईतील पाणी प्रश्न सुटणार असल्याने खासदार सुनिल तटकरे, माजी पालकमंत्री आ. आदितीताई तटकरे व आमदार अनिकेतभाई तटकरे यांचे पाटणसई ग्रामपंचायतीच्या सरपंच माधवी सदानंद गायकर, उपसरपंच सुरेश गायकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

# रोहा ज्ञानांकुर इंग्लिश मेडियम स्कूलच्या छोट्या वारकऱ्यांनी केली आषाढी एकादशी उत्साहात साजरी



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

विठू नामाचा जयघोष करत टाळ मृदुंग वाजवत हातात भगव्या पताका घेऊन डोक्यावर तुळस वृंदावन घेऊन बच्चे कंपनीने आषाढी एकादशी निमित्त वारकरी दिंडी काढून आषाढी वारी उत्सव आनंद साजरा केला.

रोहा तालुक्यातील हभप मंजुला नारायण एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे ज्ञानांकुर इंग्लिश मेडियम स्कूल या शालेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्ताने वारकरी दिंडी सोहळा आयोजित केला होता.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लोखंडे मुख्यध्यापिका सौ.रिया लोखंडे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले यावेळी शाळेतील सहशिक्षिका सोनाली शिंदे, ऋतुजा पवार, प्रतीक्षा धामणसे, रुपाली मरवडे, शुभदा भालेकर, स्नेहा मोहिते, शिक्षक -विनायक माहित, ओंकार जवरत. व मदतनीस-श्रुती वाजे आदी विद्यार्थी पालक व माता वर्ग उपस्थित होते.

टाळ मृदुंगाच्या गजरात ग्यानबा तुकारामांच्या नामघोषात जय जय राम कृष्ण हरि च्यागजरात विठ्ठल रखुमाई, श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज, संत बहिणाबाई संत मुक्ताबाई, या संतांची वेशभूषा परिधान करून हरिनामाच्या गजरात या चिमुकल्यांनी आषाढी एकादशी उत्सव साजरा केला. मुलींनी साडी परिधान करून डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन आनंदी वातावरणामध्ये दिंडी सोहळ्यात सहभागी झाले होते. विठू नामाच्या गजरात ठेका धरत बच्चेकंपनी आयोजित दिंडीत तल्लीन झाले होते. काही मुले विठ्ठल रुक्मिणीच्या वेशात आले होते वेषांतर करून आलेल्या या चिमुकल्यांची जणू शाळा भरली होती. यावेळी वारकरी बनून आलेल्या या चिमुकल्या मुलांनी हातात टाळ डोक्यावर तुळस वृंदावन घेऊन हरिनामाचा गजर केला रविवारी सुट्टीचा दिवस असूनही आपली हिंदू संस्कृती टिकली पाहिजे संत महातम्यांचे विचार मनात रुतून चिमुकल्यांनी आषाढी एकादशी उत्साहात व आनंदात साजरी केली. आषाढी वारी निमित्ताने शाळा प्रांगणातून निघालेली दिंडी विठ्ठल रुक्मिणी मंदिर खांब येथे या चिमुकल्यांनी अभंगात व गवळणीत दंग होऊन आनंद घेत परत शाळेत आली. यावेळी अनेक भाविक भक्तांनी स्वागत केले. मुलानी पालखी काढून आम्हाला विठ्ठल रुखूमाईच दर्शन दिल्याबद्दल मंदिरात खांब पंचक्रोशीतील प्रवचनकार हभप धनवी सर, हभप प्रकाश थिटे, सुरेश भोसले, संतोष टवले, माधव सानप, चितळकर, पेटकर, यांनी मुलांचे कौतूक केले तसेच अनेक पालकांनी देखील खूप कौतुक करत या चिमुकल्यांना शुभेच्छा दिल्या.